# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. ४/का-५,

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ जून,२०२२.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त.

विषय :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२२
प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांच्या संख्येबाबत.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.०९/प्रकल्प कक्ष, दि. २७/५/२०१५
२) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.०४/का.५, दि. ०९/०३/२०१६
३) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१६/का.५, दि. ३ डिसेंबर, २०१६

महोदय,

महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची आहे.

२. शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात केलेल्या दुरुस्तीनुसार सर्व महानगरपालिका निवडणुकांकरिता (बृहन्मुंबई वगळून) एक सदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय (तीन सदस्य) प्रभाग पध्दती लागू केली आहे. यामुळे प्रत्येक मतदाराला सरासरी ३ मते द्यावी लागणार आहेत.

३.	अधिनियमातील वरील दुरुस्ती लक्षात घेऊन तसेच कोरोना प्रतिबंधक उपाययोजना म्हणून राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि. २७ मे, २०१५ च्या आदेशामध्ये प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांच्या संख्येत पुढीलप्रमाणे अंशत: सुधारणा करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | महानगरपालिका | मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका (प्रत्येक मतदार -१ मत) | १००० ते १२०० मतदार प्रती मतदान केंद्र |
| २ | इतर सर्व महानगरपालिका (प्रत्येक मतदार-सरासरी ३ मते) | ८०० ते ९०० मतदार प्रती मतदान केंद्र |
| टीप:- वरील विभागणी करताना प्रभागात उर्वरित मतदार हे कमाल अगर किमानपेक्षा (१०% पर्यंत) अत्यंत थोडे अधिक/अगर कमी असतील तर त्यासाठी वेगळयाने मतदान केंद्र करण्याची आवश्यकता नाही. | | |

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भाधीन अ.क्र. ३ येथील दि. ३/१२/२०१६ चे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( अविनाश सणस )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र